# राजर्षी शाहू महाराज यांचे सामाजिक व शैक्षणिक कार्य

**प्रा. डॉ. सौ सुप्रिया अमर शिंदे.** समाजकार्य विभाग. कर्मवीर हिरे महाविद्यालय, गारगोटी.

**प्रस्तावना – (Introduction)**

बहुजन समाजोद्धारक, समाज क्रांतिकारक, आरक्षणाचे जनक, उपेक्षित, वंचित व निराधारांचे भक्कम आधार, शैक्षणिक क्रांतीचे शिल्पकार, कला, क्रीडा संस्कृतीचे आश्रयदाते, कुस्तीचे चाहते, हरित क्रांतीचे निर्माते,सहकाराचे जाणते, उद्योग, व्यवसाय व व्यापारांचे महाराष्ट्राचे भाग्यविधाते, भारतातील सामाजिक राजकीय उद्गाते राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे जीवनकार्य सर्व पिढ्यांसाठी मार्गदर्शक आणि प्रेरणादायी आहे.महाराष्ट्राच्या या मातीत छत्रपती शिवाजी महाराज रयतेच्या कल्याणासाठी हिंदवी स्वराज स्थापन केले. रयतेच्या कल्याणाचा वसा घेऊन छत्रपतींचा वारसा सांगणाऱ्या सिंहासनावर शाहू महाराज आरुढझाले. आपल्याला मिळालेल्या राजपदाला शौर्याचा त्यांचा बलिदानाचा इतिहास आहे. याची जाणीव महाराजांना होती. आपले राजपत मोठेपणासाठी प्रतिष्ठेसाठी किंवा मिरवण्यासाठी नाही हे सुद्धा त्यांनी जाणले होते. म्हणूनच शाहू महाराज राजवैभवात रमले नाहीत. रयतेच्या हितासाठी आपल्या सिंहासनाला गोरगरिबांच्या झोपडीत घेऊन गेले. झोपडीतील घोंगड्यावर किंवा शेतकऱ्यांच्या बांधावर बसणाऱ्या या राज्याने जणू घोंगड्यालाच सिंहासन बनवले. आपल्या रयतेप्रेमी कळवळा असणाऱ्या शाहू महाराजांनी आपल्या राजपदाचा, राजसत्तेचा, राजवैभवाचा, राजप्रतिष्ठेचा वापर जनहितासाठी करून एक नवा आदर्श निर्माण केला.

भारताच्या इतिहासात अनेक कर्तुत्वान राज्यकर्ते होऊन गेले अनेक राज्यकर्त्यांनी सामाजिक, राजकीय, आर्थिक व शैक्षणिक क्षेत्रात मोलाचे योगदान देऊन आपल्या कर्तृत्वाचा ठसा इतिहासात उमटवला. अशा थोर राज्यांच्यामध्ये प्राचीन काळात सम्राट अशोक, मध्ययुगीन काळात हिंदूसाम्राज्य निर्माते यादव वंशातील राजे तर आधुनिक काळात अग्रक्रमाने नाव घ्यावे लागते ते राजर्षी छत्रपती शाहू महाराज होय, राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात अनेक सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक सुधारणा करून संपूर्ण भारतात आदर्श निर्माण केला. कारण आजही त्यांनी अमलात आणलेल्या योजना मार्गदर्शक ठरत आहेत. सदर शोध निबंधमध्ये राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या कर्तृत्वाचा थोडक्यात आढावा घेतलेला आहे.

**❖उद्दिष्टे– (Objective)**

1) राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या सामाजिक आणि शैक्षणिक कार्याचा आढावा.

2) नव्या युगाची निर्मिती करणाऱ्या राजर्षी शाहू महाराजांचे व्यक्तिमत्व बहुआयामी होते. आदर्श राजासाठी हवे असणारे सर्व गुण त्यांच्यामध्ये होते. विलक्षण बुद्धिमत्ता, सामान्य स्मरणशक्ती, योजक कल्पनाशक्ती, काळाच्या पुढे पाहण्याची दूरदृष्टी, प्रभावी संवाद कौशल्य, गुणग्राहकता, व्यवहार कुशलता, मनाचा कणखरपणा, वागण्यातला बेडरपणा, निर्भीडपणा, कृतिशील कळवळा, राहणीमानातला साधेपणा, निर्मळपणा, सच्चेपणा आणि अलौकिक मानवता असणारा यासर्व गुणांनी महाराजांचे व्यक्तिमत्व साकारले होते. समाजासाठी, दलितांसाठी, वंचितांसाठी यातून थोर महंताने केलेले कार्य आजच्या तरुण पिढीला समजावे आणि यातून प्रेरणा घेऊन स्वतःसाठी, गावासाठी, देशासाठी कार्य करण्यासाठी आदर्श निर्माण व्हावा या हेतूने महाराजांच्या कार्याचा आलेख या पेपरमधून मांडला आहे.

**❖राजर्षी शाहू महाराजांचे सामाजिक क्षेत्रातील योगदान–**

राजर्षी शाहू महाराजांनी वयाच्या विसाव्या वर्षी कोल्हापूर संस्थानाचा राज्यकारभार आपल्या हाती घेतला. संपूर्ण मानव जातीस आदर्श असे कर्तृत्व त्यांनी आपल्या संस्थानात करून दाखवले. छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात समाज सुधारणा करण्याचे धोरण अवलंबले. समाजातील जाती–जमाती यांना आपल्या राज्यकारभारात सामील करून घेतले. अस्पृश्यांसाठी मोलाचे कार्य करून दाखविले. अस्पृश्यांना प्रशासनात स्थान दिल्याशिवाय त्यांची प्रगती होणार नाही याची जाणीव पहिल्यांदा राजर्षींना झालेली होती. त्यादृष्टीने प्रयत्न करून त्याकाळामध्ये प्रशासनात नोकरीत राखीव जागा ठेवण्याची व्यवस्था केली होती. आज देशांमध्ये याचा अभ्यास करून सर्वत्र आरक्षण लागू केले. आरक्षणासाठी त्यांनी जाहीरनामे काढले, सक्तीने आपला अधिकार अमलात आणणारे पहिले राजर्षी शाहू महाराज होते बहुजन समाजाची प्रगती ही फक्त शिक्षणाच्या माध्यमातून होऊ शकते. समाज हा शिक्षित झाल्याशिवाय समाजाची

उन्नती होऊ शकणार नाही. याची जाणीव राजर्शींना होती समाजामध्ये अनेक चालीरीती रुढी परंपरा परंपरेने चालत आलेल्या होत्या. यासर्व रूढी परंपरा यांना फाटा देण्याचे कार्य राजर्शी शाहू महाराजांनी केले ज्याठिकाणी अधिकारी कमी पडले, त्याठिकाणी कायद्याचा वापर करणारे हे राजर्शी छत्रपती शाहू महाराज पहिलेच होते. कारण रूढी परंपरेच्या विरोधात आवाज उठवण्याची धाडस त्या कालखंडात कुणीही करत नसत, मात्र राजांनी धाडस स्वतःच्या शिरावर घेऊन आदर्श निर्माण केला आणि जाती जमाती उच्च निच्चतेच्या जाळ्यात भरडल्या जात होत्या. त्या जाती जमातींना मुक्त करण्याचे कार्य राजांनी केले. जाती मोडून काढण्याचे कार्य त्यांनी आपल्या कार्यातून दाखवून दिले. अस्पृश्य उद्धारासाठी ब्राह्मणाबरोबरच उच्चवर्गीय यांचा विरोध होता. हा विरोध शाहू महाराजांनी मोडून काढला. समाजातील अनेक जाती, जमाती, अज्ञान, दारीद्रयात खितपत पडलेल्या होत्या अशांना उद्योग धंद्याची सवय लागावी म्हणून प्रोत्साहन त्यांनी दिले. त्यांना व्यवसायिक शिक्षण देण्याचीही व्यवस्था त्यांनी लावून दिली.

**❖भटक्याविमुक्त जाती–जमातीसाठीचे सुधारणा कार्य–**

संस्थानांमध्ये अनेक भटक्या विमुक्त जाती–जमाती होत्या उदा. डोंबारी, कंजारभाट, लमान, पारधी, रामोशी, बेरड, वंजारी, टकारी,भामटा, गारुडी, कटवूइ. होय. या जातीचे जीवन अतिशय हलाकीचे होते. त्यांना राहण्यासाठी जागा नव्हती, उद्योगधंद्याचे साधन नव्हते, त्यांच्यामध्ये शिक्षणाचा अभाव होता. विशेष या जाती भटके जीवन जगत होत्या.उदरनिर्वाहासाठी गावोगावी फिरत असत. या जातींमध्ये असणाऱ्या गुणांची पारखराजर्शींनी केली आणि त्यांच्या गुणानुसार त्यांनी आपल्या राज्यकारभारात त्यांचा उपयोग करून घेतला, ब्रिटिशांनी अशा जातींना गुन्हेगारी जाती म्हणून शिक्कामोर्तब केलेला होता. माणूस हा परिस्थितीने चोरी करतअसतो. असे मत भााहू महाराजांचे होते. त्यांना राहण्यासाठी जागा दिल्या कुची कोरवी समाजातील लोकांना उपयोग शिकारखान्यात केला तर पासेपारध्यांना रोजगाराची संधी उपलब्ध करून दिली, सरकारी कामे काढून उदा. रस्ते बांधणे, धरणे बांधणे, सार्वजनिक इमारती इ. मधुन त्यांना दोन वेळचे जेवण मिळेल याची व्यवस्था राजांनी लावून दिली.

**❖राजर्शी शाहू महाराजांचे शिक्षणासाठीचे योगदान–**

छत्रपती शाहू महाराज यांच्या राज्यकारभार सुरू होण्यापूर्वी करवीर संस्थांनात 224 प्राथमिक शाळा, माध्यमिक शिक्षणासाठी राजाराम हायस्कूल व उच्च शिक्षणासाठी राजाराम कॉलेज होते, पण या शाळांमध्ये उच्चवर्णीय विद्यार्थ्यांचीच संख्या जास्त होती. राजाराम हायस्कूलची विद्यार्थी संख्या 441 त्यामध्ये 368 ब्राह्मण विद्यार्थी होते. म्हणजे साधारण 84 टक्के विद्यार्थी ब्राह्मण समाजातले आणि उरलेले 16 टक्के इतर समाज, राजाराम कॉलेजमध्ये 61 विद्यार्थी होते. इतर 55 विद्यार्थी ब्राह्मण समाजाचे आणि त्यांना शिकवणारे पण उच्चवर्णीयच याचा अर्थ ब्राह्मणेत्तर समाजातील केवळ 10 टक्के मुले उच्चि ाक्षित होती. अनेक गावात भााळा नव्हत्या, शिक्षक नव्हते ही प्राथमिक शिक्षणाची अवस्था हा चिंतनाचा विषय होता हे विदारक दृश्य पाहून महाराज अस्वस्थ झाले.

शाहू महाराजांनी 28 मे 1913 रोजी शाळा स्थापन करण्याची आदेश प्रत्येक गावात देऊळ, चावडी, धर्म ाळा अ ा कोणत्याही ठिकाणी उपलब्ध असणाऱ्या मोकळ्या जागेत शाळा सुरू करावी. गावोगावी शाळा स्थापन झाल्या. या शाळांमध्ये विद्यार्थी दाखल झाले पाहिजेत. प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले यासाठी महाराजांनी फर्मान काढले. जे पालक आपले मुले शाळेला पाठविणार नाहीत अशा पालकांसाठी एक रुपया दंड करावा. हा दंड मुले शाळेत येईपर्यंत प्रत्येक महिन्यास करावा असे समन्स मामलेदारांना काढावयास सांगितले आणि त्याची अंमलबजावणी प्रभावीपणे केली आणि हे शाहू महाराजांचे पालकांना दंड करण्याचे फर्मान प्रभावी ठरले. बहुजन समाजाची मुले–मुली शिकून उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेऊ लागली.

राजांनी आपल्या संस्थानात शिक्षणाची गंगा सर्व जाती धर्मातील जनतेच्या दारापर्यंत पोहोचलेली होती. त्यांनी स्त्री शिक्षणाची सुरुवात आपल्या कुटुंबातील स्त्रियांच्या पासून केलेली होती. कोल्हापूर संस्थानांमधील शिक्षण अधिकारी असणाऱ्या मिस लिटल या आपल्या मायदेशी गेल्या म्हणून हे पद रिक्त झाले. या रिक्त पदावर राजांनी रखमाबाई केळकर यांची नेमणूक केली,स्त्री शिक्षणासाठी भरीव कार्य राजांनी आपल्या संस्थानात केले. त्या कालखंडात भुदरगड सारख्या भागात खास मुलींच्या शाळा निर्माण करण्यात आल्या होत्या. याचाच परिणाम म्हणून आज प्रत्येक क्षेत्रामध्ये मुलींची उंच भरारी आहे. बहुजन समाजाची मुले मुली शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून सुमारे 20 वसतीगृहे महाराजांनी सुरू केली. शाहू महाराजांनी स्थापन केलेल्या वस्तीगृहामध्ये विविध धर्माची मुले

आज शिक्षण घेत आहेत. घरापेक्षा ही वस्तीगृहात दर्जेदार सुविधा मिळाल्या पाहिजेत. वसतीगृहाचे आकर्षण मुलांना वाटले पाहिजे. मुले वसतीगृहात रमली तरच मन लावून अभ्यास करतील असे महाराजांना वाटायचे त्यामुळेच कोल्हापूरची वसतिगृहे ही होतकरू मुलांसाठी ज्ञानगृहे बनली. महाराजांनी सुरू केलेली वस्तीगृहांची चळवळ फक्त कोल्हापूर एवढीच मर्यादित न राहता शाहू महाराजांची प्रेरणा घेऊन महाराष्ट्रभर अनेक वसतिगृह निघाली.

**❖निष्कर्ष–**

अशा रीतीने एकूणच राजर्शी छत्रपती शाहू महाराज यांनी आपल्या संस्थांनात सामाजिक शैक्षणिक आणि सुधारणा घडवून आणल्यात. परंपरेने चालत आलेल्या रूढी परंपरा, अंधश्रद्धा नष्ट केल्या. बहुजन समाजाला शिक्षणाद्वारे सुसंस्कृत केले. जातिभेदाची दरी संपविण्यासाठी भरीव कार्य राजर्शीनेकेले. शिक्षणाशिवाय सामान्य जनतेचा विकास होऊ शकणार नाही असे त्यांचे ठाम मत होते. त्याचबरोबर तळागाळातील भटक्या जाती जमातीसाठी शासकीय बांधकामे काढून दोन वेळच्या जेवणाची व्यवस्था करून देणारे राजर्शी छत्रपती शाहू महाराज पहिलेच राजे होते. सन 1898 साली प्लेगची रोगाची लागण संस्थानात झाली.130 वर्षांपूर्वी महाराजांनी या महामारीवर मात करण्यासाठी जी उपाययोजना केली तीच उपाययोजना जगामध्ये थैमान घातलेल्या कोविड–19 अर्थात कोरोना या रोगाला आटोक्यात आणण्यासाठी करण्यात आली होती. ती म्हणजे देशाच्या वैद्यकीय विभागांनी राजर्शींच्या उपाययोजनेचा अभ्यास करून बाहेरून येणाऱ्या लोकांसाठी क्वारंटाईन सेंटर उघडण्यात आले आणि या महामारीवर मात केली. महाराजांनी आपल्याला संदेश दिलेला आहे की,

'आभाळाएवढी ज्याची उंची
त्यानी थोडे खाली यावे
मातीत ज्यांचे जन्म मळले
त्यांना थोडे उचलून घ्यावे'

अशा छत्रपती शाहू महाराजांना सलाम .

**संदर्भ ग्रंथ–**

1) डॉ जयसिंगराव पवार – श्री शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर. प्रथम आवृत्ती 2001 पृष्ठ क्रमांक 101, 102

2) साळुंखे पी. बी – राजर्शी शाहू गौरव ग्रंथ, मुंबई 1976 पृष्ठ क्रमांक. 165

3) प्रा. साळुंखे नानासाहेब – शाहूंच्या आठवणीने कृष्णाली प्रका ान, कोल्हापूर. प्रथम आवृत्ती 2012 स्पष्ट क्रमांक 72.

4) लके आ.ना.– छत्रपती शाहू महाराजांचे चरित्र, बेळगाव. 1925 पृष्ठ क्रमांक 91, 94.

5) संदीप मगदूम– लोकराजा छत्रपती शाहू महाराज. प्रथम आवृत्ती 2022 मराठीदेशा फाउंडेशन, पुष्ट क्रमांक 71, 101.